# शिवाजी विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया तात्पुरती स्थगित

## कुलगुरुंचा निर्णय : सकल मराठा समाजाच्या आंदोलनाची दखल

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मराठा आरक्षण अंमलबजावणीचा निर्णय होईपर्यंत शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया तात्पुरती स्थगित करीत असल्याचा निर्णय कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सकल मराठा समाजासमोर जाहीर केला.

प्रवेशाची जाहिरात प्रसिद्ध झाल्याने सकल मराठाच्या संतप्त कार्यकर्त्यांनी शनिवारी कुलगुरूंची भेट घेऊन भावना मांडल्या. बुधवारी (दि. ९) आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी आहे. त्यामुळे या चर्चेअंती आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत ही प्रक्रिया रद्द करावी आणि निर्णय झाल्यानंतर ती पुन्हा सुरू करावी, असे ठरले. विद्यापीठाची एम. एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम भाग १ आणि एम.ए., एम.कॉम., एलएल.एम. भाग १ या नियमित अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ७ ते १४ डिसेंबरदरम्यान होणार होती. सकल मराठा समाजाचे समन्वयक प्रसाद जाधव, प्रकाश सरनाईक, संजय वाईकर, चंद्रकांत बराले, वैभवराज भोसले, महादेव आयरेकर, दिलीप माने, राजेंद्र चव्हाण, गणेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे आधीच मराठा समाजातील मुलांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. यामुळे प्रवेश प्रक्रिया थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली.

(छायाचित्रे पान /१०)

## मराठा आरक्षण : वकिलांची समन्वय समिती जाहीर

मुंबई : एसईबीसी आरक्षणप्रकरणी सुप्रीम कोर्टाचा अंतरिम आदेश रद्द करण्याच्या राज्य शासनाच्या मागणीसंदर्भात ५ सदस्यीय घटनापीठासमोर होणाऱ्या सुनावणीच्या अनुषंगाने मराठा आरक्षणविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी पाच वकिलांची समन्वय समिती जाहीर केली आहे. समितीमध्ये ॲड. आशिष गायकवाड, ॲड. राजेश टेकाळे, ॲड. रमेश दुबे पाटील, ॲड. अनिल गोळेगावकर व ॲड. अभिजित पाटील यांचा समावेश आहे. याबाबत ९ डिसेंबरला दुपारी २ वाजता होणाऱ्या सुनावणीच्या अनुषंगाने समाजातील नागरिक, समन्वयक, अभ्यासक व संघटनांना कायदेशीर स्वरूपाच्या सूचना मांडायच्या असतील तर समन्वय समितीतील सदस्यांशी संपर्क साधावा.

# कंत्राटी प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ

- ७८ प्राध्यापकांना दिलासा
- व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामधील विविध अधिविभागांमध्ये कार्यरत असणाऱ्या ७८ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांना ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबतचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. त्यासह नव्या आर्थिक वर्षातील ताळेबंद हा अधिसभेसमोर सादर करण्याच्या विषयाला मंजुरी देण्यात आली.

विद्यापीठामध्ये सध्या कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या अधिविभागांमध्ये सध्या ८४ नियमित प्राध्यापक, तर ७८ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक कार्यरत आहेत. यातील कंत्राटी प्राध्यापकांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मुदतवाढ दिली होती. या प्राध्यापकांची मुदत सोमवार (दि. ७) संपणार होती. त्यामुळे पुनर्नियुक्तीबाबत कोणता निर्णय होणार याकडे त्यांचे लक्ष लागले होते. व्यवस्थापन परिषदेने या कंत्राटी प्राध्यापकांना तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यासह पुढील कालावधीसाठी प्राध्यापकांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया येत्या १५ दिवसांत सुरू करण्याची सूचना विद्यापीठ प्रशासनाला दिली. विद्यापीठाचे अंदाजपत्रक हे बुधवार ३० डिसेंबर रोजी अधिसभेसमोर सादर होणार आहे.